दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● बुधवार दि.१ ऑक्टोबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ४६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Wednesday 1 Oct 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 46 ● Pages 4 ● Rate 4 Rs

### शिधा आणण्याचे कार्यकर्त्यांना आवाहन

**बीड**-पंकजा मुंडे म्हणाल्या, कुणीतरी विचारले हा दसरा मेळावा साधेपणाने करणार का? मला हसू आले. माझा दसरा मेळावा साधाच असतो. अठरापगड जाती धर्माचा संगम असलेली ही परंपरा आहे. त्यामुळे, पूरग्रस्त भागात यंदा ज्यांच्या घरात चूल पेटू शकत नाही, दसऱ्यादिवशी पुरणपोळी खाता येणार नाही, त्यांच्यासाठी आपण पुढे या. आपण सर्वजण दसरा मेळाव्यासाठी येत असताना चना डाळ, गुळ, गव्हाचे पीठ आपल्यासोबत आणून भगवान बाबा चरणी अर्पण करा, असे आवाहन पंकजा मुंडे यांनी केले.तसेच, भगवान बाबा चरणी आलेला हा प्रसाद त्या पूरग्रस्त गावात पोहच करायचा आहे. त्यासाठी, भेटूया सावरगाव घाट भगवान भक्ती गड येथे २ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता, असे पंकजा मुंडे म्हणाल्या.

# पंकजा मुंडेंचा दसरा मेळावा ठरणार वेगळा

## पूरग्रस्तांच्या मदतीसाठी चना डाळ,गुळ,गव्हाचे पीठ सोबत आणण्याचे समर्थकांना आवाहन

### शिधा आणण्याचे कार्यकर्त्यांना आवाहन

**पंकजा मुंडे म्हणाल्या, कुणीतरी विचारले हा दसरा मेळावा साधेपणाने करणार का? मला हसू आले. माझा दसरा मेळावा साधाच असतो. अठरापगड जाती धर्माचा संगम असलेली ही परंपरा आहे. त्यामुळे, पूरग्रस्त भागात यंदा ज्यांच्या घरात चूल पेटू शकत नाही, दसऱ्यादिवशी पुरणपोळी खाता येणार नाही, त्यांच्यासाठी आपण पुढे या. आपण सर्वजण दसरा मेळाव्यासाठी येत असताना चना डाळ, गुळ, गव्हाचे पीठ आपल्यासोबत आणून भगवान बाबा चरणी अर्पण करा, असे आवाहन पंकजा मुंडे यांनी केले.तसेच, भगवान बाबा चरणी आलेला हा प्रसाद त्या पूरग्रस्त गावात पोहच करायचा आहे. त्यासाठी, भेटूया सावरगाव घाट भगवान भक्ती गड येथे २ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता, असे पंकजा मुंडे म्हणाल्या.**



**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील आणि विशेषतः मराठवाड्यातील अतिवृष्टी व पुराने निर्माण केलेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या यंदाच्या दसरा मेळाव्यांकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. पंकजा मुंडे यांच्या बीडमधील भगवान भक्ती गडावर होणाऱ्या दसरा मेळाव्याची तयारी सुरू आहे. मात्र, या वर्षीच्या पंकजा मुंडेंच्या दसरा मेळाव्याला राज्यातील पूरग्रस्तांसाठीची भावनिक किनार आहे. या पार्श्वभूमीवर यंदाचा मेळावा 'राजकीय व्यासपीठ' म्हणून नव्हे तर समाजकारणाशी जोडलेली परंपरा म्हणून साजरा होणार असल्याचे पंकजा मुंडे म्हणाल्या. तसेच मेळाव्याला येताना समर्थकांनी चना डाळ, गुळ आणि गव्हाचे पीठ घेऊन यावे, असे आवाहन एका व्हिडिओतून केले आहे.

पंकजा मुंडे म्हणाल्या, राज्यातील काही भागात महापुराची परिस्थिती निर्माण झाली. प्रत्येकाचे पिक गेले. घरांमध्ये पाणी शिरले. काही लोकांचे तर जमीन आणि घरही वाहून गेले. त्यांच्यासाठी सरकार नक्कीच योग्य निर्णय घेईल, अशी मला पूर्ण शाश्वती आहे. आता येतोय दसरा मेळावा. हा दसरा मेळावा जरी आपण म्हणत असलो, तरी हा मेळावा नाही, कुठली सभा, सामाजिक किंवा राजकीय व्यासपीठ नाही. ही परंपरा आहे. जी परंपरा भगवान बाबांनी सुरू केली. ज्या परंपरेमध्ये अनेक लोक सहभागी झाले. त्यानंतर मुंडे साहेबांनी त्या परंपरेला उंचीवर नेले. त्यांच्या ही परंपरा तुमच्या आग्रहास्तव मी राखून ठेवली. माझ्या श्वासात श्वास असेपर्यंत ही परंपरा खंडित होऊ देणार नाही, असे म्हणत पंकजा मुंडेंनी यंदाच्या दसरा मेळावाही उत्साहात होणार असल्याचे स्पष्ट केले.

### तुमच्या दर्शनाने मला ऊर्जा मिळते

**त्या पुढे म्हणाल्या, मी भगवान बाबांच्या दर्शनासाठी येत आहे, सावरगाव येथील भक्ती गडावर भगवान बाबांच्या चरणी, त्यांची पूजा करण्यासाठी त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी मी येत आहे. आपण ही परंपरा खंडित होऊ देणार नाही. पुराचे पाणी गावात शिरले आहे, मला माहितीये. तुमच्या अडचणी आहेत. ज्यांच्या अडचणी आहेत, त्यांनी काही करावे, अशी माझी अपेक्षा नाही. पण मी मात्र, ही परंपरा खंडीत होऊ देणार नाही. माझ्या भाषणाने तुम्हाला ऊर्जा मिळत असल्याचे तुम्ही म्हणता, तर तुमच्या दर्शनाने मला ऊर्जा मिळते. तुमच्या विराट रुपाचे दर्शन होते, तुमचे आशीर्वाद मिळतात. वर्षभर संघर्ष करण्याची ऊर्जा मला या मेळाव्यातून मिळते.**

# केज तालुक्याचे भूमिपुत्र ते हैद्राबाद विद्यापीठाचे विभाग प्रमुख डॉ.सरवदे

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील साबला (ता. केज, जि. बीड) या छोट्याशा गावातील डॉ .विष्णु सरवदे या सुपुत्राने उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात गगनभरारी घेतली आहे. गावातील सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या या तरुणाने कठोर परिश्रम, चिकाटी व शैक्षणिक गुणवत्तेच्या जोरावर हैद्राबाद येथील नामांकित हैदराबाद केंद्रीय विश्वविद्यालयाच्या (उशपीीरश्र णपळींशीीळीूष कूब्रशीरलरव) हिंदी विभाग प्रमुखपदाची धुरा सांभाळण्याचा मान मिळवला आहे.

बालपणापासूनच अभ्यासू वृत्ती व साहित्याविषयी आकर्षण असलेल्या या विद्वानाने प्राथमिक शिक्षण गावातच पूर्ण केले. पुढे उच्च शिक्षणासाठी औरंगाबाद येथे शिक्षण घेत असताना त्यांनी हिंदी साहित्याच्या विविध अंगांचा सखोल अभ्यास केला. संशोधनप्रवण दृष्टी, लेखनाची ओढ आणि अध्यापनातील गोडी यामुळे ते विद्यार्थ्यांमध्ये अत्यंत लोकप्रिय झाले.शिक्षण क्षेत्रात त्यांनी विविध विषयांवर संशोधन करून अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिसंवादात प्रतिनिधित्व केले आहे. त्यांच्या अनेक शोधनिबंधांना व पुस्तकांना शैक्षणिक व साहित्य क्षेत्रात विशेष दाद मिळाली आहे. त्यांनी मुंबई विद्यापीठ, नाथीबाई दामोदर ठाकरशी महिला विद्यापीठ मुंबई च्या हिंदी विभागात देखील विभाग प्रमुख म्हणून कार्य केलेले आहे तसेच ते जर्मनी



### गावकऱ्यांच्या मत

**गावातूनच शिक्षण घेत पुढे गेलेल्या आमच्या मुलाने आज हैद्राबाद विद्यापीठात विभाग प्रमुख होणे म्हणजे संपूर्ण तालुक्यासाठी अभिमानाची बाब आहे. हे यश सर्व तरुणांसाठी प्रेरणादायी आहे.या निवडीमुळे त्यांचे साहित्य क्षेत्रातुन व केंद्रीय विश्वविद्यालय हैद्राबाद तसेच केज तालुक्यातुन अभिनंदन होतं आहे.**

येथील बॉन विद्यापीठात भारत सरकारच्या भारत स्स्कृतिक संबंध विभागा मार्फत हिन्दी विषय शिकवण्याचे काम केले आहे. ते २०१८ पासुन हैदराबाद विद्यापिठात कार्यरत आहेत , त्यांच्या कार्याचा गौरव करून हैद्राबाद विद्यापीठाने त्यांची हिंदी विभाग प्रमुख म्हणून त्याची नियुक्ती केली आहे.या यशामुळे केज तालुक्याचे नाव उज्ज्वल झाले असून साबला गावातील ग्रामस्थांसह संपूर्ण परिसरात अभिमानाची भावना व्यक्त केली जात आहे. विद्यार्थ्यांना आदर्श ठरतील अशा त्यांच्या कार्यामुळे ग्रामीण भागातील तरुणांना प्रेरणा मिळणार आहे.

# २ आक्टोबरला होणाऱ्या धम्म परिषदेसाठी तुलसी शैक्षणिक समूहातर्फे मोफत बस सेवा

## छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच बार्शी नाका येथून बस सुटणार

**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय सहावी बौद्ध धम्म परिषद गुरुवार, दि. २ ऑक्टोबर २०२५ रोजी महाविहार धम्मभूमी, डॉ. भदंत आनंद कौसल्यायन नगर, शिवणी येथे होत आहे. या परिषदेला बीड जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात अनुयायी व नागरिक उपस्थित राहावेत, यासाठी तुलसी शैक्षणिक समूह, बीड तर्फे मोफत बससेवेचे आयोजन करण्यात आले आहे.ही बस सेवा छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच बार्शी नाका, बीड येथून सुटणार असून, परिषद स्थळापर्यंत मोफत ने-आण सुविधा दिली जाणार आहे. त्यामुळे परिषदेसाठी जाणाऱ्या अनुयायांना प्रवासाची मोठी सोय होणार आहे.धम्म परिषदेला देश-विदेशातील भिक्खू संघ, विद्वान, मान्यवर व हजारो अनुयायी उपस्थित राहणार असून, या परिषदेतून धम्मविचारांचा प्रसार, सामाजिक बांधिलकी आणि परिवर्तनाचा संदेश दिला जाणार आहे.मोफत बससेवेच्या माध्यमातून बीडकरांना धम्म परिषदेत सहभागी होता येणार असून, या पारंपरिक व ऐतिहासिक सोहळ्यासाठी सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे तुलसी शैक्षणिक समूहाने आवाहन केले आहे.

# बालाजी यात्रा उत्सव निमित्ताने गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज यांची सदिच्छा भेट

**नेवासा । विष्णु मुंगसे**

नेवासा तालुक्यातील बालाजी देडगाव येथे धर्म ध्वजारोह निमित्ताने श्री क्षेत्र देवगडचे महंत भास्करगिरी महाराज यांनी सदिच्छा भेट दिली आज पासून बालाजी देवस्थान उसाला अखंड नाम सप्ताहाला सुरुवात झाली असून ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला सुरुवात झाली आहे तसेच विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे संध्याकाळी नामवंत महाराजांची किर्तन सेवा पार पडत आहे आज महत सुदर्शनमुनी महाराज उदासीन यांची कीर्तन रुपी सेवा कीर्तन रुपी सेवा संध्याकाळी ७ ते ९ पार पडणार आहे त्यावेळी महाराजांनी बालाजीचे मनोभावे दर्शन घेतले तसेच मंदिर परिसराची पाहणी करून समाधान व्यक्त केले त्यावेळी बालाजी मंदिर सभागृह येथे कार्यक्रम पार पडनार आहे बालाजी देवस्थानच्या वतीने गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज ह .भ. प. सुखदेव



महाराज मुंगसे ह .भ .प. सदाशिव महाराज पुंड ह. भ .प .पाटेकर महाराज यांचा सन्मान करण्यात आला तर या वेळेस महाराज बोलताना म्हणाले की देवस्थान अतिशय वैभवशाली असून मला बालाजीरायानेच दर्शनाला बोलावलेआहे निसर्गाने जो अहंकार चालवला आहे यातून सर्वांची जीवनाची मुक्तता व्हावी सर्वांनी संकट दूर व्हावे व मानव जीवनाला धोका होऊ नये गोमातेचे रक्षण होय अशा गोष्टीसाठी आपण सर्वांनी प्रार्थना करावी भगवत सर्वांवर कृपा करी राशी यावेळी आशीर्वाद रुपी बोलले यावेळी देवस्थानचे अध्यक्ष नवनाथ पाटील बालाजी देवस्थानचे सचिव रामानंद मुंगसे कुंडलिक दादा कदम विद्यमान सरपंच चंद्रकांत मुंगसे मा. चेअरमन बाबासाहेब मुंगसे ज्येष्ठ पत्रकार बन्सी भाऊ एडके पत्रकार इनुस पठाण भाऊसाहेब पाटील मुंगसे चंद्रभान कदम भीमराज मुंगसे सुधाकर नांगरे मधुकर तांदळे बळीरा संघटनेचे अध्यक्ष मच्छिंद्र मुंगसे बाळासाहेब कुटे बालाजी देवस्थानचे विश्वस्त बाळासाहेब मुंगसे रामभाऊ कुटे संभाजी काजळे चांगदेव तांबे भगवान मुंगसे पांडुरंग रक्ताते सुनील शेठ मुथा सतीश मुथा किशोर मुंगसे सुभाष मुंगसे व सर्व भजनी मंडळ तसेच गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

# लातूर जिल्ह्यातील सहा गावांतील जमीन हादरली

## घाबरलेले नागरिक रस्त्यावर : कलांडी, डांगेवाडी परिसरातील रात्र जागून

**लातूर । नदीम पटेल**

सोमवारी दुपारी आणि रात्री उशिरा कलांडी, डांगेवाडी आणि निटूर (ता. निलंगा) परिसरात सलग चार वेळा जमीन हादरल्याची घटना घडली. भूगर्भातून गूढ आवाज आला. तर तळणी, सय्यदपूर, कुंभारवाडी (ता. रेणापूर) परिसरात दुपारी भूगर्भातून गूढ आवाज आल्याच्या घटना घडल्या. परिणामी, घाबरलेले नागरिक घराबाहेर पडले. तर निलंगा तालुक्यातील कलांडी परिसरात नागरिकांनी रस्त्यावर रात्र जागून काढली.सोमवारी रात्री १०.३० वाजता कलांडी, डांगेवाडी आणि निदूर परिसरात पहिल्यांदा भूगर्भातून गूढ आवाज आला आणि जमीन हादरली. दुसऱ्या वेळी ११.०४ वाजता पुन्हा जमीन हादरली अन् तिसऱ्यांदा ११.१६ वाजता, ११.५७ वा. चौथ्यांदा



भूगर्भातून गूढ आवाज आल्याने अबालवृद्धांसह ग्रामस्थ घराबाहेर पडले. काही घरांतील भांडीही खाली पडली.निलंगा तालुक्यातील कलांडी, डांगेवाडी, निटूर परिसरात सोमवारी रात्री उशिरा भूगर्भातून गूढ आवाज आला. त्यानंतर जमीन हादरली. कलांडीत नागरिकांनी रात्र जागून काढली.लातूर जिल्ह्यातील सलगरा, दगडवाडी, राणी अंकुलगा, शिरूर अनंतपाळ, बोरवटी, औसा, हासोरी, मुरुड-अकोला, कलांडी, डांगेवाडी, निटूर परिसरात भूगर्भातून आवाज आल्याच्या घटना घडल्या. त्यानंतर जमीन हादरली. मात्र हा आवाज भूकंप नाही. भूगर्भातील हालचाल होत असल्याने असे प्रकार घडत आहेत. नागरिकांनी घाबरू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.भूगर्भातून गूढ आवाज येत आहेत. मुरुड-अकोला, हासोरी आणि बोरवटी येथील भूकंपाची नोंद झाली आहे. इतर गावांतील आवाज हे भूकंप नसल्याचा निर्वाळा नवी दिल्ली येथील भूकंम मापक केंद्राने दिला.

# अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकरी नागरिकांच्या मदतीसाठी सहाय्यता समिती स्थापन करणार-आ.सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी विधानसभा मतदारसंघ अंतर्गत..आष्टी,पाटोदा आणि शिरूर (कासार) शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे मोठा फटका बसला असून त्यांचे भूत न भूतो न भविष्यती नुकसान झाले आहे त्यामुळे या अस्मानी संकटामुळे बाधित झालेल्या सर्वसामान्य नागरिक शेतकरी शेतमजूर यांच्या कुटुंबीयांचे आगामी सहा महिन्याकरता मदत करण्याचा आमचा उद्देश असून यासाठी समाजातील सर्वसमावेशक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात येणार आहे अशी माहिती आमदार सुरेश धस यांनी दिली याबाबत अधिक माहिती देताना ते पुढे म्हणाले की हवामानातील अचानक बदलामुळे झालेल्या अतिवृष्टी मुळे आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील शेतकरी यांच्या शेतीचे घरांचे पिकांचे कांदा चाळीचे नुकसान झाले असून सर्वसामान्य नागरिकांच्या घरातील वस्तूंचे अतोनात नुकसान झाले आहे या अस्मानी संकटामुळे त्यांचे न भूतो न भविष्यती नुकसान झालेले आहे काही शेतकऱ्यांना एक गुंठा ही जमीन शेती योग्य राहिली नसून यावर्षी खरीप हंगामामध्ये त्यांना उत्पन्न मिळणार नाही सद्यस्थितीमध्ये तात्पुरती मदत म्हणून अनेक संस्था अनेक सेवाभावी संस्था यांचे वतीने मदत कार्य सुरू आहे परंतु ही व्यवस्था तत्पुरत्या स्वरूपात करण्याऐवजी या पूरग्रस्त अतिवृष्टी ग्रस्त बाधित कुटुंबीयांना आगामी सहा महिन्यापर्यंत सहाय्यता देण्याची आवश्यकता आहे हे लक्षात घेऊन व्यापक स्वरूपात अर्थसहाय मदत रूपाने गोळा करावी लागणार आहे या मदत कार्यासाठी सर्वसमावेशक सदस्यीय उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात येणार असून आष्टी,पाटोदा,आणि शिरूर (कासार) तालुक्यातील विविध संस्था, पतसंस्था, सेवाभावी संस्था, विश्वस्त संस्था, देवस्थान, शासकीय कर्मचारी, पदाधिकारी व्यापारी, यांचेकडून ऐच्छिक स्वरूपात मदत मिळावी अशी अपेक्षा असून या प्रक्रियेमध्ये जी संस्था अथवा व्यक्ती सर्वोच्च अर्थसहाय्य जाहीर करील त्यापेक्षा ज्यादा माझी वैयक्तिक मदत त्यामध्ये असणार आहे या सर्व मदत कार्याच्या प्रक्रियेमध्ये पारदर्शकता येण्यासाठी या समितीचे गठन करण्यात येणार आहे आज याबाबत चर्चा केली असता श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान सावरगाव २१ लक्ष रुपये कृषी उत्पन्न बाजार समिती पाच लाख रुपये आष्टी तालुका दूध उत्पादक संघ पाच लक्ष रुपये धनश्री सहकारी पतसंस्था एक लक्ष रुपये अशा प्रकारे आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे ज्या दानशूर व्यक्तींना या सामाजिक कार्यामध्ये सहभागी व्हायचे आहे त्यांनी यथाशक्ती अर्थसहाय्य करून या मदत यज्ञामध्ये आपला सहभाग असे आवाहनही त्यांनी शेवटी केले आहे



संपादकीय

# मुलांवर अभ्यासाचं ओझं नको

विद्यार्थीदशेमध्ये यश-अपयश हे प्रत्येकांच्या जीवनात येत असते. मात्र त्यावर मात करता आली पाहिजे. त्यासाठी पालकांनी आपल्या मुलांना अभ्यासासाठी प्रोत्साहित करायला हवे. तसेच पालकांनी शैक्षणिक उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी मुलांना प्रवृत्त केले पाहिजे. मुलांचा आत्मविश्वास वाढवायला हवा. त्यासाठी शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन शिक्षणाची आवड निर्माण करा, ते ओझं वाटायला नको. कारण शिक्षण हेच मुलांच्या परिवर्तनाचे साधन आहे हे मुलांना पटवून दिले पाहिजे.मुलांना अभ्यासाची आवड नसते, ही काही नवीन गोष्ट नाही. अशी अनेक मुले आहेत ज्यांना अभ्यास ही शिक्षा वाटते आणि ते फक्त खेळावर लक्ष केंद्रित करतात. बाहेर आपले मित्र खेळतात मग आपणच का अभ्यासात डोकं खुपसून बसायचं, असे अनेक प्रश्न त्यांच्या मनात असतात. यात मुलांचाही दोष नाही; परंतु मुलांचा अभ्यास न करण्याच्या सवयीमुळे पालकांना त्यांची खूप चिंता वाटत असते. कारण मुलांनी अभ्यास केला नाही तर, साहजिकपणे शाळेत शिकवल्या जाणाऱ्या गोष्टी नीट समजणार नाही आणि मग ज्या वेगाने शिकायला हवे त्या गतीने ते सर्व काही शिकू शकणार नाही; परंतु मुलांच्या अभ्यासात रस नसण्यामागे इतरही अनेक कारणे असू शकतात. अशा परिस्थितीत, येथे जाणून घ्या की, पालक म्हणून तुम्ही मुलाला अभ्यास करण्यासाठी कसे प्रोत्साहित करू शकता. जेव्हा मुलं अभ्यास करत असतील तेव्हा तुम्ही त्याच्या जवळ बसू शकता. पण, मुलांचे टेन्शन वाढवणार नाही यासाठी प्रयत्न करा. जर कोणी मुलासोबत बसले तर त्यांना अभ्यास करण्याची इच्छा होते आणि कंटाळा येत नाही, पण पालकांच्या उपस्थितीमध्ये त्यांना भीती वाटत असेल किंवा आई-वडील मुलांना ओरडत असतील तर मुलं घाबरतात. त्यामुळे अभ्यासामधून त्यांचे पूर्णपणे लक्ष विचलित होते. आजच्या काळात अनेक मुले अभ्यासाकडे दुर्लक्ष करतात. याचा परिणाम परीक्षा जवळ आली की, वेगवेगळी कारणे सांगून पालकांमध्ये संभ्रम निर्माण करतात. तेव्हा परीक्षा केव्हाही सुरू झाली तरी मुलांनी नियमित अभ्यास करायला हवा. त्यासाठी पालकांनी आपल्या मुलांना अभ्यास करण्यास प्रवृत्त करायला हवे. तरच मुलांना अभ्यास करण्यास गोडी लागेल. अनेक मुले अभ्यास करण्यास दुर्लक्ष करतात याची कारणे शोधली पासहिजेत. ती सुद्धा मुलांना विश्वासात घेऊन. त्यासाठी घरामध्ये शैक्षणिक वातावरण निर्माण करायला हवे. म्हणजे मूल अभ्यास करण्यास प्रेरित होईल. तसेच त्यांना अभ्यास करण्यास उत्तेजन मिळेल.मुलांवर तशाप्रकारे प्रभाव पाडला पाहिजे. त्यासाठी पालकांचा दृष्टिकोन सकारात्मक असायला हवा. मुले शाळेतून घरी आल्यावर लगेच त्यांना अभ्यासाला बसवू नये. त्यांना थोडा वेळ खेळण्यासाठी द्यावा. नंतर त्यांना अभ्यासाला बसवावे. अशावेळी घरातील वातावरण शांत ठेवावे. त्यांची बसण्याची जागा सुद्धा ठरवावी. त्याआधी शाळेच्या वेळेच्या नंतर अभ्यासासाठी वेळ निश्चित करावी. सर्व शाळांची वेळ सारखी नसते. म्हणजे मुलं वेळच्या वेळी अभ्यास करतील. बऱ्याच वेळा आई-वडील टीव्ही लावून एखादी मालिका बघतात. त्याच्या आवाजाचा परिणाम मुलांच्या अभ्यासावर होतो. तेव्हा पालकांनी सुद्धा मुलांच्या अभ्यासाच्या वेळेत टीव्हीला विश्रांती द्यावी. असं केल्याने मुलांना नियमित अभ्यासाच्या वेळेत अभ्यास करण्याची सवय लागते. यासाठी घरात अभ्यासासाठी वातावरण निर्माण करायला हवे. अभ्यासाच्या वेळेत पालकांनी आपल्या आवडी-निवडीवर निर्बंध घातले पाहिजेत. मुले चांगला अभ्यास करून उत्तीर्ण कसे होतील याकडे अधिक लक्ष द्यावे. प्रत्येक विषयांची शालांत स्तरापर्यंत पुस्तके असतात. त्यातील प्रत्येक परीक्षेला अभ्यासक्रम कोणता आहे. त्याचे परीक्षेपूर्वी अध्ययन झाले का? त्यातील कोणता भाग समजला नसेल तर अध्यापकांकडून समजून घ्यावा. म्हणजे परीक्षेला कोणत्याही प्रकारची शंका निर्माण होणार नाही. त्यामुळे ते परीक्षेत नेत्रदीपक प्रगती करू शकतात.आई-वडील आपल्यासाठी जी मेहनत घेतात त्याची मुलांना जाणीव असायला हवी. बऱ्याच मुलांना पालक सांगतात की, तू शाळेत पहिला आल्यास, तुला एक मोठं बक्षीस देणार असे आधीच त्यांना सांगायचं हे चुकीचं आहे. विशेष किंवा प्रथम श्रेणीत पास झाल्यास तुझ्या आवडीचे कपडे घेणार किंवा तुला टू व्हीलर घेऊन देणार? अशामुळे मुलांना उत्तेजन मिळते. आपण चांगल्या गुणांनी पास झाल्यास आपल्याला आपले आई-वडील बक्षीस देणार म्हणून मुले अभ्यास करण्याकडे अधिक लक्ष देतात. त्यासाठी त्यांना अधिक परिश्रम घ्यावे लागतात. अशावेळी अभ्यासाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. मुलांसाठी बक्षीस जरी मिळाले तरी मुलांच्या भवितव्याच्या दृष्टिकोनातून ते प्रयत्न करतात. काही ठिकाणी पर्यायी विषय असतात. त्यातील योग्य व आपल्या मुलांच्या आवडीचा विषय निवडावा. दहावीनंतर कला, वाणिज्य, विज्ञान किंवा इतर व्यावसायिक अभ्यासक्रम निवडण्याचा अंतिम निर्णय मुलांवर सोडवा. मात्र प्रत्येक शाखेविषयी माहिती त्याला देण्यात यावी. शेवटी आवड ही महत्त्वाची असते. मुलांच्या आवडीनुसार अभ्यासक्रम निवडल्यास तो अधिक जोमाने अभ्यास करेल. त्यासाठी प्रामाणिकपणे आपल्या भविष्याचा विचार करून अभ्यास करायला हवा. काही पालक अभ्यास करा म्हणून मुलांना प्रत्येक दिवशी सांगतात. तेव्हा असं न करता त्यांना आपल्या अभ्यासाची जाणीव व्हायला हवी. त्यांनी स्वत:हून अभ्यासाला बसायला हवं. त्यात त्यांनी आपण धड्याचे वाचन करून सारांश लेखन सुद्धा करायला हवं. म्हणजे अभ्यासाची नियमित सवय मुलांनीच लावायला हवी. महत्त्वाची बाब म्हणजे मुलांच्या आवडी-निवडीप्रमाणं मुलांना प्रोत्साहन द्यायला हवं.त्यासाठी विविध विषयांवर विचारवंतांची व्याख्याने आयोजित केली असतील तर अशा व्याख्यानांना मुलांना घेऊन जाणे. आपल्या परिसरात वैचारिक नाटक, चित्रपट मुलांना दाखवावे. ऐतिहासिक स्थळांना भेट देणे व मुलांना वर्षातून एकदा तरी सहल काढावी. त्याचप्रमाणे अभ्यास दौऱ्यांचे आयोजन करण्यात यावं. जेणेकरून मुलांना प्रेरणा मिळून मुलांचा आत्मविश्वास वाढण्याला मदत होते. यामुळे अभ्यासाकडे अधिक मुले लक्ष देतात.त्यांना एक नव्याने अभ्यास करण्याची ऊर्जा मिळालेली असते. काही मुलांना आपण अभ्यास करताना आई किंवा वडील आपल्या सोबत असावे असे वाटते. तसं काही मुलं आई-वडिलांना बोलूनही दाखवितात. मात्र सध्याच्या धावपळीच्या जीवनात ते सर्वच पालकांना शक्य नसते. तरी आपण अभ्यास करताना पालकांनी थोडावेळ आपल्यासोबत बसावे असे मुलांना वाटते. तेवढाच आधार त्यांना वाटत असतो. काही शंका असल्यास ताबडतोब आपल्या शंकांचे निरसन होऊ शकते असे मुलांना वाटते. तेव्हा मुलांच्या आवडीप्रमाणे थोडावेळ मुलांबरोबर पालकांनी बसायला काहीच हरकत नाही. त्यामुळे त्यांना अभ्यास करण्यास धीर येतो. त्यांचा अभ्यासाचा उत्साह वाढतो. थोडक्यात असे म्हणता येईल की, मुलांना अभ्यासासाठी प्रोत्साहित करणे हे आई-वडिलांसाठी एक आवाहन असते. मात्र त्यांच्या समस्या समजून घेऊन त्यांना अभ्यास करण्यासाठी सकारात्मक वातावरण निर्माण केल्यास मुलं बिनधास्तपणे अभ्यास करण्यास प्रोत्साहित होतील.

# संत रामपाल जी महाराजांच्या सत्संगात 'चार युगांतील परमेश्वराचे रहस्य' उलगडले

## नंदुरबार जिल्ह्यातील काथर्दा दिगर येथे शेकडोंच्या उपस्थितीत अध्यात्मिक मार्गदर्शनाचा लाभ

**नंदुरबार । दिपक गोसावी**

दिनांक २८ सप्टेंबर २०२५, वार रविवार रोजी नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील काथर्दा दिगर येथील मंगल कार्यालयात संत रामपाल जी महाराज यांच्या जिल्हा सत्संगाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. सकाळी ११ वाजता सुरू झालेल्या या कार्यक्रमाला नंदुरबार,शहादा अक्कलकुवा, तळोदा, धडगाव आणि नवापूर यांसारख्या विविध तालुक्यांतील शेकडो अनुयायांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. या सत्संगामध्ये संत रामपाल जी महाराजांचे मार्गदर्शन प्रोजेक्टरच्या माध्यमातून उपस्थित भक्तगणांना लाभले. महाराजांनी आपल्या प्रवचनातून परमात्म्याचे स्वरूप आणि चार युगांमधील त्याचे अवतार या विषयावर सखोल ज्ञान दिले. संत रामपाल जी महाराज म्हणाले की, प्रत्येक युगात परमेश्वर पृथ्वीवर अवतार घेतो. याबाबत त्यांनी एक महत्त्वपूर्ण दोहा सांगितला: सतयुग में सत सुकृत पुकारे, त्रेता



नाम मुनींद्र मेरा। द्वापर मे करुणामय कहाये, कलयुग नाम कबीर धराये।। याद्वारे त्यांनी स्पष्ट केले की कलियुगात परमात्मा कबीर रूपात प्रकट झाले. महाराजांनी संतांची उदाहरणे देत सांगितले की, परमेश्वरानेच नानक, दादूजी यांसारख्या संतांना तारले. त्यांनी कबीर साहेबांनी काशीमध्ये विणकराची भूमिका कशी केली, यावर प्रकाश टाकला. तसेच, 'खरा परमात्मा' आपल्या अनुयायांना योग्य नाम अर्थात नामदीक्षा देतो, ज्याच्या सामर्थ्याने भक्त संसार-सागरातून पार होतात. सत्य नामाचे महत्त्व सांगताना त्यांनी कबीरांचा दोहा उद्धृत केला: कबीर, जब ही सतनाम हृदय धर्यो, भयो पाप को नाश। मानो चिंगारी अग्नि की, पड़ी पुराणे घास।। म्हणजेच, सतनाम धारण करताच क्षणार्धात पापांचा नाश होतो, जसे अग्नीची ठिणगी जुने गवत जाळून टाकते. सत्संग समारोप करताना महाराजांनी परमेश्वराच्या सामर्थ्याचे वर्णन केले: अनंत कोटी ब्रह्मांड का एक रति नहीं भार... सतगुरु पुरुष कबीर है, कुल के सृजनहार। याचा अर्थ, सांगतांना ते म्हणाले की,अनंत ब्रह्मांडाच्या निर्मितीचा आणि पालनाचा भार ज्यांच्यावर आहे, ते कबीर साहेबच परमेश्वर आहेत. या भव्य आयोजनात चप्पल बूट सेवादार, बुक स्टॉल सेवादार, जलराम सेवादार यांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने सेवा केली. भक्तांनीही रांगेत उभे राहून चहा-बिस्किट प्रसादाचा स्वीकार केला, ज्यामुळे या सत्संगाला अध्यात्मिक शिस्तीची जोड मिळाली.

# पॅसेंजरला लूटून खून केलेल्या ऑटो वाल्याला अटक

## विवेकानंद चौक पोलीस ठाणे, लातूर;आरोपी सह स्थानिक गुन्हे शाखेची टीम

**लातूर । नदीम पटेल**

पॅसेंजरला लूटून खून केलेल्या ऑटो वाल्याला अटक. दिनांक २९/०९/२०२५ रोजी मयत अमिरअली सय्यद व उत्तरप्रदेशातील कामगार लोकेशकुमार, सचिनकुमार, इशेंद्रकुमार असे सोलापुर येथुन मयताचे गावी सायगाव ता. अंबाजोगाई जि. बिड कडे जाणेसाठी लातुर येथे आले असता नवीन रेणापुर नाका लातुर येथे रात्री १.३० वाजणेच्या सुमारास ऑटोचा धक्का लागल्यानंतर झालेल्या वादाच्या कारणावरुन ऑटो मध्ये आलेल्या समिर नावाच्या इसमाने व त्याच्या सोबतच्या अनोळखी ऑटो चालक इसमाने अमिरअली सय्यद यास हाताने व चाकुने मारहाण करुन चाकुचा धाक दाखवुन अमिर जवळील मोबाईल हिसकावुन घेवुन त्यास त्यांचेजवळील ऑटो मध्ये जबरदस्तीने बसवुन घेवुन जावुन चाकुने मारहाण करुन अमिरअली सय्यद यास जिवे ठार मारुन हॉटेल आण्णा व्हेज नॉनव्हेज चे गेट समोरील रिंग रोडचे कडेला टाकुन निघुन गेले. अशी तक्रार मयतासोबत असलेल्या कामगाराच्या फिर्यादी वरुन




पो.स्टे. विवेकानंद चौक लातुर येथे गुरन ६४७/२०२५ कलम १०३ (१), १४० (४), ३११,३ (५) बीएनएस प्रमाणे गुन्हा दाखल करुन पुढील तपास सपोनि खोडेवाड हे करित आहेत. माहीती मिळताच घटनास्थळी वरिष्ठ पोलीस अधिकारी तसेच उपविभागीय पोलीस अधीकारी लातूर शहरश्री समीरसिंह साळवे, पो.नि. बावकर स्था.गु.शा. लातुर यांनी तात्काळ भेट देवुन यातील आरोपीतांचा शोध घेणे बाबत व तपासाबाबत सुचना दिल्या. दिलेल्या सुचनेप्रमाणे पो.स्टे. विवेकानंद चौक येथील पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांनी त्यांचे स्टापसह तपास करुन गुन्ह्यातील आरोपी शेख समीर दिलावर, वय २६ वर्षे रा. साई रोड आर्वी लातुर यास अटक करुन त्याचेकडुन गुन्ह्यातील हत्यार तसेच गुन्हा करण्यासाठी वापरलेला ऑटो जप्त करण्यात आला आहे.तसेच एक विधीसंघर्षग्रस्त बालक यास ताब्यात घेण्यात आले असुन गुन्ह्याचा पुढील तपास चालु आहे.सदरची कामगीरी पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधीकारी लातूर शहर श्री. समीरसिंह साळवे यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे विवेकानंद चे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांचे नेतृत्वात पोलीस ठाणे विवेकानंद चौक, लातूर येथील सपोनि अन्नाराव खोडेवाड, वसंत मुळे, पोउपनि रेडेकर, पोलीस अमंलदार खुर्रम काझी, सुनिल हराळे, रविंद्र गोंदकर, यशपाल कांबळे, रणविर देशमुख, धैर्यशिल मुळे, सचिन राठोड, गणेश यादव, आनंद हल्लाळे, दयानंद उपासे, महेबुब शेख, चालक दिपक कांबळे यांनी केली आहे.

# अतिवृष्टीमुळे नुकसान भरपाई म्हणून पंजाब सरकार शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रती हेक्टर देवू शकते

## मग महाराष्ट्र सरकार का देवू नाही?

निसर्गाने अन्नदाता शेतकऱ्यांवर चौतर्फा भडीमार केला असुन शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे व अत्यंत चिंतेत आहे ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.त्यामुळे आता यत्किंचितही वेळ न करता राज्यातील पक्ष विपक्षाच्या संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांनी संपूर्ण राजकीय मतभेद बाजूला सारून शेतकऱ्यांची सर्वोतोपरी मदत युध्दपातळीवर करण्याची खरी वेळ आली आहे.आज राज्यातील ९२ लाख हेक्टर जमीन पाण्याखाली आली आहे.यांना सरकार मदत म्हणून प्रती हेक्टर फक्त साडेआठ हजार रुपये मदत देण्याची घोषणा केली आहे.पंजाबमध्ये सुध्दा अशीच परिस्थिती होती तेव्हा पंजाब सरकारने शेतकऱ्यांसाठी प्रती हेक्टर ५० रूपये जाहीर केले त्यामुळे आता प्रश्न आहे की पंजाब सरकारला ५० हजार रुपये प्रती हेक्टर परवडतात मग देशाची आर्थिक राजधानी असलेल्या महाराष्ट्राला शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रती हेक्टर देण्यात काय अडचण आहे?माझ्या माहितीनुसार ही तुटपुंजी मदत म्हणजे मुंगीसाठी साखर एवढी मदत आहे.त्यामुळे हि मदत प्रती हेक्टर कमीत कमी ५० हजार रुपये सरकारने जाहीर करण्याची गरज आहे. आज शेतकऱ्यांना सरकार कडून भिक नको सरळ मदत हवी.आता शेतकऱ्यांच्या बांधावर जाण्याची गरज नाही कारण निसर्ग स्वतः सांगत आहे की शेतकऱ्यांचे किती भयावह नुकसान झाले आहे आणि ही बाब महाराष्ट्रासह संपूर्ण देश उघड्या डोळ्यांनी पाहत आहे.त्यामुळे शेतकऱ्यांच्या बाबतीत पंचनामे किंवा अन्य तपासणी न करता त्यांच्या बँक खात्यात सरसकट प्रती हेक्टर ५० हजार रुपये व सर्वोतोपरी मदत केली पाहिजे सोबतच वित्तीय हानी,शेतीची हानी आणि जमिनजुमल्याची हानीची ताबडतोब स्थानिक प्रशासनाने पडताळणी करून तात्काळ मदत पुरविली पाहिजे व कर्जमुक्त केले पाहिजे. कारण शेतकरी जगला तरच आपल्याला अन्न पुरवठा होईल व देशाची १४० कोटी जनता जगेल हा मुलमंत्र आजच्या संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांनी, राज्य सरकारांनी व केंद्र सरकारने लक्षात ठेवले पाहिजे.आज राज्यातील आजी माजी राजकीय पुढाऱ्यांजवळ करोडोंची मोठ्या प्रमाणात चलअचल संपत्ती आहे आणि राजकीय पुढाऱ्यांमध्ये खरोखरच मानुसकी असेल तर आपल्या संपत्तीचा फक्त १० टक्के भाग या कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांच्या जखमेवर फुंकर घालण्यासाठी वापरला पाहिजे. ही प्रक्रिया एकट्या



महाराष्ट्रानेच नाही तर संपूर्ण भारतातील राजकीय पुढाऱ्यांनी अंगिकारली पाहिजे. यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल.कारण सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांची वित्तीय हानी, जीवीत हानी,पशु हानी मोठ्या प्रमाणात झाली आहे आणि त्याच्या डोळ्यातील अश्रूच्या धारा वाहत आहे.राजकीय पुढाऱ्यांनो आपण कृषिप्रधान देशात रहातो ही बाब कदापि विसरू नका.कारण आजही राज्यासह देशातील अनेक भाग पावसाच्या बाबतीत रेड अलर्टवर आहेत आभाळ फाटत आहे.महाराष्ट्रातील अतिवृष्टीची व्यथा मुख्यमंत्र्यांनी केंद्र सरकारपर्यंत पोसचविली आहे ती मदत येण्याच्या आधी राज्यातील राजकीय पुढाऱ्यांची,स्थानिक प्रशासनाची व सरकारची मदत ताबडतोब शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे अपेक्षित आहे. राज्यातील संपूर्ण मंत्र्यांसह राजकीय पुढाऱ्यांनी आपले संपूर्ण दौरे रद्द करून शेतकऱ्यांच्या मदतीसाठी आत्मचिंतन करावे व मदतीचा हात सामोरं करावा.कारण महाराष्ट्रातील संपूर्ण शेतकरी आज पाण्याखाली आला आहे त्याला या दु:खातुन बाहेर काढण्यासाठी आज राजकीय पुढारी, स्थानिक प्रशासन, सरकार व राज्यातील जनतेने सामोरं येण्याची गरज आहे व सर्वांनीच शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे.या आपात्कालीन परिस्थितीत एकही पीडीत शेतकरी सुटणार नाही याचीही काळजी सरकारने घ्यावी.कारण परिस्थिती भयानक आणि चिंताजनक आहे सोबतच पाऊसाचा जोर अजुनही कमी झालेला नसुन जसाचा तसाच आहे.आता सरकारने शेतकऱ्यांच्या कोणत्याही कर्जाचा विचार न करता सरसकट कर्ज माफी करावी आणि ही संपूर्ण वसुली राजकीय पुढाऱ्यांच्या खिशातून करावी.कारण आज करोडपती शेतकरी हवालदिन होऊन शुन्य झाला आहे आणि पाच वर्षे लोकप्रतिनिधी पद भोगलेला राजकीय पुढारी करोडपती झाला असून मोठ्या प्रमाणात चलअचल संपत्तीचा मालक आहे व सात पिढ्या बसून खाईल इतकी संपत्ती आज राजकीय पुढाऱ्यांजवळ आहे.त्यामुळे शेतकऱ्यांची मदत कुठेही थांबणार नाही याची जाण सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी ठेवली पाहिजे.कारण अन्नदात्या शेतकऱ्यांचे सर्वंच पीके अतिवृष्टीमुळे पाण्याखाली आली आहे.राजकीय पुढाऱ्यांनी बांधावर जाऊन फक्त फोटो काढू नका कृती करा.सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी ताबडतोब अन्नधान्य व जिवनावश्यक वस्तूंचा मुबलक पुरवठा शेतकऱ्यांना करावा.सोबतच सरकारने शेतकऱ्यांना शेती लागवडीसाठी आलेला खर्च व प्रती हेक्टर ५० हजार रुपये नुकसानभरपाई म्हणून ताबडतोब उपलब्ध करून द्यावे.आज शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सामाजिक संस्था, देवस्थानच्या संस्था, शाळा-महाविद्यालये व राज्यातील नागरिक मदतीसाठी सरसावले आहेत.या संपूर्ण बाबींची जान सरकारने गांभीर्याने घ्यावी व सरकार मार्फत शेतकऱ्यांना हवी ती संपूर्ण मदत करावी.आपातग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे न करता सरसकट जास्तीत जास्त मदत करा. सध्याच्या परिस्थितीत अन्नदाता शेतकरी अत्यंत भयावह संकटात सापडलेला आहे.ढगफुपी व अती पाऊसाने मराठवाडा, कोकण, विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्राला पुर्णतः जनु काय पाऊसाने वेढुन झोडपले आहे.यामुळे राज्यातील ७५ टक्के शेतकऱ्यांची शेती पाण्याखाली आल्याने त्यांचे जगणे असह्य झाले आहे व त्यांचा संपूर्ण परिवार अत्यंत दु:खी आहे.देशासह राज्यातील संपूर्ण शेतकऱ्यांची धुरा निसर्गावर अवलंबून असते.परंतु निसर्ग नेहमीच साथ देत नाही.त्यामुळे प्रत्येक शेतकरी आपल्या पोटाची खळगी भरण्याइतकी कमाई करून घेतो.कारण प्रत्येक शेतकऱ्यांना ओला दुष्काळ आणि सुका दुष्काळाचा सामना करावा लागतो आणि याच संघर्षातुन उत्पन्न काढत असतो व १४० कोटी जनतेच्या पोटाची खळगी भरत असतो.परंतु आज देशासह राज्यातील प्रत्येक शेतकरी अती पाऊसामुळे अत्यंत कठीण परिस्थितीत सापडला आहे. अस्मानी संकटामुळे राज्यातील शेतकऱ्यांची भयावह स्थिती मागील महिन्यांपासून संपूर्ण भारतात पाऊसाने उग्र रूप धारण करून अनेक ठिकाणी ढग फुटीच्या घटना झाल्या.या संपूर्ण घटनांचा सरकारने गांभीर्याने दखल घेवून राज्यातील काही विकास कामे व इतरत्र खर्च बाजूला सारून शेतकऱ्यांच्या मदतीला सरकारने सर्वतोपरी प्राधान्य देवून मदत केली पाहिजे व अतीवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी सरकारने ओला दुष्काळ जाहीर करावा.सोबच राज्यातील बॉलिवूड क्षेत्र,पुंजीपतीवर्ग व व्यापारीवर्ग यांनी सुध्दा शेतकऱ्यांना सरळ हातांनी मदत करण्यासाठी सामोर येण्याची गरज आहे.जय हिंद.जय जवान जय किसान.

**-रमेश कृष्णराव लांजेवार**

# कृषी उत्पन्न बाजार समितीच्या हिंदुस्थान पेट्रोल पंपाचे उद्घाटन संपन्न

**माजलगाव | दर्शन डोंगरे**

येथील कृषी उत्पन्न बाजार समितीची उप बाजारपेठ असलेल्या दिंद्रुड येथे बाजार समितीच्या हिंदुस्थान पेट्रोल पंपाचे उद्घाटन आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या हस्ते दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी साडेअकरा वाजता संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बहुजन नेते बाबुरावजी पोटभरे हे तर प्रमुख पाहुणे राजाभाऊ मुंडे,संभाजीराव शिंदे,शेषराव जगताप,चेअरमन विरेंद्र सोळंके ,रवींद्र सोळके,महादेव तोंडे,अच्युतराव लाटे, संभाजी शेजुळ,बजरंग साबळे ,संतोषराव यादव नवनाथ धाईजे,भीमराव टाकणखार अजय कोमटवार,अजय जाधव, शेख अखिल भाई,नानासाहेब ठोंबरे, सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक सभापती जयदत्त नरवडे यांनी केले. उद्घाटन पर भाषणात आमदार



सोळंके म्हणाले की, शेतकऱ्यांना अधिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा बाजार समितीचा उपक्रम असुन दिंद्रुड येथे उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या हिंदुस्थान पेट्रोलियम पंपाचे साध्या पद्धतीने उद्घाटन करण्यात आले. हा पंप दिंद्रुड-आडस मार्गावर उभारण्यात आलेला असून, परिसरातील नागरिकांसाठी याचा निश्चित फायदा होईल. माजलगाव बाजार समितीचा आणखी विस्तार करण्यासाठी कृषी विभागाकडून जमीन मिळावी, यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा केला जात असुन लवकरच ही जमीन हस्तांतरित होईल. तसेच माजलगाव, वडवणी आणि धारूर या तिन्ही बाजार समिती सुस्थितीत असल्यामुळे, शेतकऱ्यांसाठी अधिक सुविधा निर्माण करण्याचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत. दिंद्रुड येथे शेड निर्मित करून आडत दुकाने सुरू करण्याचे नियोजन आहे आणि लवकरच हे कामही मार्गी लागेल अशी अपेक्षा व्यक्त करत पेट्रोल पंप उद्घाटनास शुभेच्छा दिल्या तर अध्यक्षीय समारोपात बाबुराव पोटभरे यांनी सभापती नरवडे व उपसभापती मोरे यांच्या नेतृत्वात बाजार समिती चांगले काम करत असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन कनिष्ठ लिपिक सिद्धेश्वर येवले यांनी केले तर आभार संचालक कॉ. दत्ता डाके यांनी मानले. कार्यक्रमास संचालक आसारामजी घायतिडक आबाजी भोसले,उद्धवराव नाईकनवरे,संजयजी कचरे अमोल जाधव,प्रभाकरराव होके,जुगलकिशोर नावंदर सचिव हरिभाऊ सवणे,अधिकारी, कर्मचारी वर्ग तसेच शेतकरी बांधव उपस्थित होते.

### शेतकऱ्याच्या ट्रॅक्टर मध्ये मोफत डिझेल टाकून पंपाचा शुभारंभ

**माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने नेहमीच शेतकरी हित जोपासले जाते. बाजार समितीच्या वतीने पेट्रोल पंप उद्घाटनाला देखील संगम येथील शेतकरी पद्माकर मुंडे यांच्या ट्रॅक्टर क्रमांक एम. एच. २३ ६८६९ मध्ये एक हजार रुपयांचे मोफत डिझेल टाकून पेट्रोल पंपाचा शुभारंभ करण्यात आला.**

# दसरा मेळाव्यास उपस्थित रहावे-सुरज घुले

**केज | प्रतिनिधी**

सावरगाव घाट (ता. पाटोदा) येथे भगवान भक्ती गडावरील पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या दसरा मेळाव्यास हजाराच्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन भारतीय जनता पक्षाचे युवा नेते सुरज भैय्या घुले यांनी केले. मुंडे यांनी आयोजीत केलेला दसरा मेळावा हा ऐतिहासिक होत असून संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष या मेळाव्याकडे लागलेले असते.



राष्ट्रीय संत श्रीभगवान बाबा यांच्या जन्मभूमीत दसरा मेळाव्यात पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे ह्या मार्गदर्शन करणार आहेत. या मेळाव्याचे साक्षीदार होण्यासाठी सर्व समाज बांधवांनी उपस्थित राहावे. दसरा मेळावा हा कोणत्या राजकीय पक्षाचा नसून, दसरा मेळाव्याचे मुख्य प्रयोजन समाजातील उपेक्षित, शोषित, न्याय वंचितांच्या हक्कासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे. त्यामुळेच हा केवळ मेळावा नसून, एक सामाजिक चळवळ आहे. त्यामुळे या मेळाव्यासाठी जास्तीत जास्त संख्येने समाज बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन भाजपचे युवा नेते सुरज रामकृष्ण घुले यांनी केले आहे. मेळाव्याची जय्यत तयारी केली जात आहे.

# सुकळी येथील दशरथ विश्वनाथ गिरी यांच्या शेतातील पावसामुळे प्रचंड नुकसान ;मंडळ अधिकारी व तलाठी यांच्या उपस्थितीत पंचनामा

**केज | प्रतिनिधी**

सुकळी शिवारातील तलाठी सज्जा गोटेगाव येथील दशरथ विश्वनाथ गिरी यांच्या सर्वे नं. ९/२ मधील सोयाबीन पिकांना अवकाळी पावसाने मोठे नुकसान झाले आहे.सलग पडणाऱ्या पावसामुळे पिके पाण्याखाली बुडली असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे.या शेतातील परिस्थितीची पाहणी करण्यासाठी मंडळ अधिकारी विकास हजारे आणि तलाठी खतीब यांनी स्थानिक शिवाराची प्रत्यक्ष पाहणी केली.पंचनाम्या दरम्यान पिकांच्या नुकसानाचे अचूक मोजमाप करून नोंदवले गेले.शिवार सुकळी असूनही पिकांच्या पाण्यामुळे सोयाबीनची उभारणी पूर्णतः नष्ट झाल्याचे पंचनाम्यात नमूद करण्यात आले.शेतकऱ्यांनी या



पंचनाम्याद्वारे शासना कडे तातडीने आर्थिक मदत मिळवण्यासाठी प्रयत्न करावे,अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.पंचनाम्याच्या आधारे भरपाईची प्रक्रिया सुरू होईल आणि शेतकऱ्यांना नुकसान भरपाईसाठी आवश्यक ती मदत मिळेल,अशी माहिती मंडळ अधिकारी यांनी दिली.शेतकऱ्यांनी सांगितले की,अशा प्रकारच्या अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान वारंवार होत असल्या मुळे शासनाने या भागासाठी दीर्घकालीन उपाययोजना करणे गरजेचे आहे.

# लाड पागे समितीच्या शिफारशीप्रमाणे तांत्रिक बाबींमुळे प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढा-गोरक्ष लोखंडे

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

सफाई कामगारांच्या हक्कासाठी राज्य सरकारने स्थापन केलेल्या लाड पागे समितीच्या शिफारशीअंतर्गत महानगरपालिकेमध्ये तांत्रिक बाबींमुळे प्रलंबित असलेली नियुक्तीची प्रकरणे तातडीने निकाली काढून कामगारांच्या वारसांना शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी कार्यवाही करण्याचे निर्देश राज्य अनुसूचित जाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांनी दिले.महानगरपालिकेच्या सभागृहात आयोजित बैठकीत ड. लोखंडे बोलत होते. बैठकीस महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, उपायुक्त डॉ. संतोष टेंगळे, सहायक आयुक्त मेहेर लहारे, आरोग्य अधिकारी डॉ. राजुरकर, कनिष्ठ अभियंता आदित्य बल्लाळ, कामगार अधिकारी धनंजय शित्रे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.श्री. लोखंडे म्हणाले, कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांना नियमानुसार वेतन व सवलती द्याव्यात, कामगारांना किमान वेतन मिळेल याची दक्षता घ्यावी. सफाई कर्मचाऱ्यांना हातमोजे, मास्क आदी सुरक्षा साधने तात्काळ पुरवावीत. कर्मचाऱ्यांची नियमित आरोग्य तपासणी करण्यात यावी.




रमाई आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांना वेळेत लाभ देण्यात यावा. शहरातील झोपडपट्टी भागात आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा पुरविण्याच्या सूचनाही लोखंडे यांनी यावेळी दिल्या.यावेळी श्री. लोखंडे यांनी महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या महसुलाच्या एकूण ५ टक्के निधीतील आस्थापना खर्च व आर्थिक दुर्बल घटकांवरील तरतुदींचा मागील पाच वर्षांचा आढावा व कामाची तपासणी केली. तसेच लाड पागे समिती, दलित वस्ती, अण्णाभाऊ साठे सुधार योजना व अनुकंपा भरतीबाबतही उपस्थित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली.शासकीय विश्रामगृह, अहिल्यानगर येथे जिल्हा परिषदेचा समाजकल्याण विभाग तसेच सहाय्यक आयुक्त कार्यालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचा आढावाही श्री. लोखंडे यांनी अधिकाऱ्यांकडून घेतला. यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, सहायक आयुक्त प्रविण कोरगंटीवार, जिल्हा परिषदेचे समाजकल्याण अधिकारी देविदास कोकाटे, नगरपालिका प्रशासनाचे सहआयुक्त श्री. खांडकेकर यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.यावेळी श्री. लोखंडे यांनी कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजना, दलित सुधार योजना या योजनांबरोबरच भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संविधान जागृतीबाबतच्या कार्याचा विस्तृत आढावाही घेतला.

# किल्लारी भूकंप पीडितांना औसा तालुक्यात आदरांजली



**औसा | प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील किल्लारी येथे ३० सप्टेंबर १९९३ रोजी झालेल्या भीषण भूकंपात मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांना आज जिल्हा प्रशासनाच्यावतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगी पोलीस दलाने हवेत तीन फैरी झाडून मानवंदना दिली.कार्यक्रमात औसा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना यांनी स्मृतीस्तंभाला पुष्पचक्र अर्पण करून शोकाकुल कुटुंबीयांना सांत्वन केले.या वेळी भूकंपात प्राण गमावलेल्या नागरिकांच्या स्मृती जपण्यासाठी उभारण्यात आलेल्या स्मृती वनात वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार घनश्याम अडसूळ, गट विकास अधिकारी आनंद मिरगणे, किल्लारीच्या सरपंच सुलक्षणा बाबळसुरे यांच्यासह स्थानिक अधिकारी, कर्मचारी व अनेक नागरिक उपस्थित होते.या श्रद्धांजली कार्यक्रमातून भूकंपात हकनाक बळी गेलेल्या शेकडो नागरिकांच्या आठवणींना उजाळा मिळाला.

# अनुदानापासून वंचित असणाऱ्या शिक्षकांची दिवाळी गोड करण्याचा शासनाचा प्रयत्न-प्रियाराणी पाटील मॅडम

## बीड जिल्ह्यातील वाढीव टप्पा अनुदानाच्या आदेशांचे वाटप; अंशतः अनुदानित शिक्षकांत समाधान!

**बीड | प्रतिनिधी**

मागील अनेक वर्षापासून विना अनुदानित शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांना अनुदान देऊन अनुदानापासून वंचित असणाऱ्या शिक्षकांची दिवाळी गोड करण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे मत शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील मॅडम यांनी विना अनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांच्या वाढीव टप्पा अनुदान आदेश वाटप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना सांगितले. यावेळी व्यासपीठावर उपशिक्षणाधिकारी नानासाहेब हजारे, उपशिक्षणाधिकारी, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मनोज धस, अधीक्षक अजय बहीर, वेतन अधीक्षक राजेश खटावकर, शिक्षक नेते उत्तम पवार, डी. टी. सोनवणे, जितेंद्र डोंगरे, दत्तात्रय चव्हाण आदी उपस्थित होते. राज्यातील विना अनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांना वाढीव टप्पा अनुदान मिळावे अशी मागणी गेल्या अनेक दिवसा पासून होती. सरकारने ०१ ऑगस्ट २०२५ पासून वाढीव टप्पा अनुदान आणि त्यासाठी लागणारा निधी पावसाळी अधिवेशनात मंजूर केला. या शासन निर्णया प्रमाणे शासनाने ठरवून दिलेल्या निकषांची पूर्तता करणाऱ्या बीड जिल्ह्यातील सर्व शाळांना वाढीव टप्पा अनुदान आदेश तयार करण्यात आले. या वेळी वाढीव टप्पा अनुदान आदेश वाटपाचा कार्यक्रम घ्यावा अशी विनंती महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समिती, स्वराज्य शिक्षक संघटना, शिक्षण समन्वय संघ, बीड जिल्हा मुख्याध्यापक संघ, महाराष्ट्र शिक्षण संस्था महामंडळ याशिवाय शिक्षण क्षेत्रात सातत्याने विविध प्रश्नावरती काम करणाऱ्या विविध शिक्षक आणि शिक्षकेत्तर





संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम यांच्याकडे केली. विविध शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या विनंतीला मान देऊन शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम यांनी वाढीव टप्पा अनुदान आदेश वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन काल मंगळवार आज दिनांक ३० सप्टेंबर २०२५ रोजी स्काऊट भवन येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम यांच्यासह उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. मान्यवरांच्या स्वागत समारंभाच्या कार्यक्रमानंतर विविध शिक्षक संघटनेच्या वतीने प्रतिनिधिक स्वरूपामध्ये जितेंद्र डोंगरे आणि दत्तात्रय चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले. त्याच्या मनोगता नंतर ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मनोज धस यांनी उपस्थित सर्व शिक्षक, मुख्याध्यापक यांना सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम म्हणाल्या की, विना अनुदानित शाळेत काम करणाऱ्या शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत शासन आणि प्रशासन अत्यंत संवेदनशील आहे. या शिक्षकांच्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या प्रति शासन सतत सकारात्मक विचार करत आहे. नुकतेच शासनाने या विना अनुदानित शाळांना अनुदानावर आणण्यासाठी आणि अंशतः अनुदानित असणाऱ्या शाळांना पुढील वाढीव टप्प्याचे अनुदान देण्यासाठी आवश्यक असणाऱ्या निधीची तरतूद ही केली आहे. थोडक्यात सांगायचे झाल्यास गेली अनेक वर्षापासून अनुदानापासून वंचित असणाऱ्या शिक्षकांची दिवाळी गोड करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. आज विना अनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांना वाढीव टप्प्याच्या आदेशाचे वाटप करत असताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे. पुढील वाढीव टप्प्याचा म्हणजेच १०० टक्के अनुदानाचा वाढीव टप्पा आपणास लवकरात लवकर देण्याचे भाग्य आम्हाला मिळो अशी सदिच्छा यावेळी श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम यांनी व्यक्त केली. यावेळी बीड जिल्ह्यातील ८० टक्के अनुदानास पात्र झालेल्या ८२ शाळा आणि ७६ तुकड्यांना, ६० टक्के अनुदान घेत असलेल्या ०९ शाळा आणि २१ तुकड्या, ४०% अनुदान घेत असलेल्या पाच शाळा आणि १६० तुकड्या, २० टक्के अनुदान घेणाऱ्या ०९ तुकड्या अवघ्या २ तासांमध्ये १००% आदेशाचे वाटप करण्यात आले. ज्या शाळा पटा अभावी अनुदानास पासून वंचित आहेत. या शाळेच्या बाबतीत वरिष्ठांचे मार्गदर्शन घेऊन त्यांचाही अनुदानाचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम यांनी दिले. दरम्यान प्राथमिक विभागाच्या वतीने ही २० टक्के,४० टक्के ६० टक्के आणि ८० टक्के वाढीव टप्पा अनुदानाचे आदेश वाटप करण्यात आल्याचे समजते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक विनय केंडे सर यांनी तर आभार आत्माराम वाव्हळ सर यांनी केले. या कार्यक्रमासाठी बीड जिल्ह्यातील अनुदानास पात्र असणाऱ्या सर्व शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोदावरीच्या पाण्याने घेरले; खा.सोनवणेंनी पाण्यातून जात पुरग्रस्तांचे पुसले आश्रू

## बैलगाडी, दुचाकीवर बसून घेतल्या नुकसानग्रस्तांच्या भेटी

**माजलगाव । दर्शन डोंगरे**

आधीच जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नद्या दुथडी वाहत असताना जायकवाडी धरणातून ३ लाख क्यूसेस पाणी सोडण्यात आले. परिणामी, गोदावरीच्या पाण्याने माजलगाव तालुक्यातील अनेक गावांना घेरले आहे. दि.३०सप्टेंबर रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी पाण्यात असलेल्या गावात जावून पुरग्रस्तांचे आश्रू पुसले. यावेळी पुराच्या पाण्यातून गावात जाण्यासाठी त्यांनी बैलगडी, दुचाकीचाही वापर केला.बीड जिल्ह्यात दि.१४ सप्टेंबरपासून पाऊस आहे. मध्यल्या काळात अनेकदा अतिवृष्टी झाली. यामुळे सर्वच नद्यांना महापूर आला. नद्यांचे पाणी काही प्रमाणात कमी झाली झाले असताना जायकवाडी धरणातून दोन दिवसांपुर्वी ३ लाख क्यूसेस पाणी सोडण्यात आले. २००६ नंतर पहिल्यांदाच इतके पाणी सोडण्यात आले होते. यामुळे माजलगाव तालक्यातील अनेक गावे पाण्यात आहेत. अनेक गावांना जाण्यासाठी रस्ता राहिलेला नसून मुख्य



रस्त्यावर पाणी आहे. दि.३० रोजी सकाळी खा.बजरंग सोनवणे यांनी सकाळी पुरग्रस्तांच्या मदतीसाठी सुरूवात केली. माजलगाव तालुक्यातील टाकरवण, शेलगावथडी, रिदोरी, कवडगावथडी, राजेगाव, हिवरा, काळेगावथडी, महातपुरी, पुरूषोत्तमपुरी, जायकोचीवाडी, सादोळा आदि गावात भेटी दिल्या. यातील अनेक गावातील रस्त्यावर पाणी आहे. सदरील पाण्यातून जाणे मोठे जिकीरीचे काम आहे. परंतु खा.बजरंग सोनवणे यांनी नागरिकांच्या भेटी घेण्यासाठी कवडगावथडी येथे बैलगाडी वापरली. तर काही ठिकाणी दुचाकीवरून प्रवास करत पाण्यातून वाढ काढली. त्यांनी गावात भेट दिल्यानंतर त्यांनी महिला-पुरूषांशी संवाद साधत, गावात पुर आला, संसार भिजला आहे. यामुळे मोठे नूकसान झाले असून यामुळे कोणीही खचून जाऊ नका. तुम्हाला उभा करण्यासाठी आम्ही सरकारकडून मदत मिळवून देऊ, त्यासाठी मी प्रयत्न करत आहे. गावात ज्यांचे घर पाण्यात गेले आहे, त्यांच्या मदतीने आपणच तातडीने जा, त्यांची अडचण समजून घ्या आणि एकेमकांना मदत करा. सरकारी मदत मिळवून देण्यासाठी आम्ही वेळप्रसंगी लढा उभा करू, पण तुम्हाला एकटे सोडणार नाहीत, असा शब्दही खा.बजरंग सोनवणे यांनी दिला. यावेळी त्यांच्यासोबत माजलगाव मतदारसंघाचे नेते मोहन जगताप आणि राष्ट्रवादीचे पदाधिकारी उपस्थित होते.कवडगावथडी येथे खा.बजरंग सोनवणे हे पोहचल्यानंतर एका तरूण शेतकऱ्यांने रस्त्याशेजारी असलेल्या शेतातील पाण्यात उडी मारली. त्याठिकाणी या शेतकऱ्याचे अडीच एक्कर हळदीचे पिक आहे. त्या शेतकऱ्याने पाण्यात बुडी घेवून हळदीचे पिक उपटून दाखवायला आणले. यानंतर त्या तरूणाला आश्रू अनावर झाले. त्याच्या डोळ्यातील आश्रू पाहून खा.बजरंग सोनवणे यांनी तु काळजी करू नको, तुला उभा करण्यासाठी शासन स्तरावरून मदत मिळवून देतो, त्यासाठी मी तुमच्या पाठिशी आहे, असे म्हणून तरूणाला धीर दिला.

# तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनचा नाशिकमध्ये मानाचा तुरा

### युवा महोत्सव एकांकिका स्पर्धेत प्रथम पारितोषिक

**बीड । प्रतिनिधी**

एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ आयोजित उत्तर महाराष्ट्र प्रादेशिक युवा महोत्सवात तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीडने एकांकिका स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.नाशिक येथील केन केंद्रे कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट येथे २७ व २८ सप्टेंबर रोजी हा महोत्सव पार पडला. नृत्य, नाट्य, संगीत, साहित्य व ललित कला अशा विविध स्पर्धांत विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला.या स्पर्धेत तुलसी कॉलेजच्या विद्यार्थिनी आरती औटे, सवने वनिता व सहकाऱ्यांनी सादर केलेल्या पाझर या एकांकिकेच्या प्रभावी प्रयोगाने परीक्षक व प्रेक्षकांची मने जिंकत प्रथम क्रमांक मिळवला.या यशामागे प्राचार्य डॉ.सुनील



जोंधळे, प्रा.सुप्रिया ससाने आणि प्रा.श्वेता वंजारे यांचे मार्गदर्शन लाभले. विजयामुळे महाविद्यालयात आनंदाचे वातावरण असून सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तुलसी शैक्षणिक समूहाचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे यांनी विद्यार्थिनींच्या परिश्रमाचे कौतुक करून त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

# एम.के.डी.कॉलेजचे दोन विद्यार्थी विभागीय वुशु स्पर्धेसाठी निवडले

### धुळे येथे होणाऱ्या स्पर्धेत नंदुरबारचे प्रतिनिधित्व करणार

**नंदुरबार । दिपक गोसावी**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नंदुरबार यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत एम. के. डी. आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नंदुरबारच्या दोन विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करत विभागीय वुशु स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे. ३०/०९/२०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, नंदुरबार येथे ही स्पर्धा पार पडली.

कठोर परिश्रम आणि उत्कृष्ट कौशल्याच्या जोरावर या दोन्ही विद्यार्थ्यांनी आपापल्या वजन गटात प्रथम क्रमांक पटकावला. यात आझाद धरमसिंग प्रधान (५० किलो वजन गट) आणि साजिद सलाम शेख (६५ किलो वजन गट, १९ वर्षाखालील मुले) यांचा समावेश आहे. त्यांची निवड आता धुळे



येथे होणाऱ्या विभागीय वुशु स्पर्धेसाठी झाली असून ते नंदुरबार जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला. संस्थेचे संचालक माननीय शुभम किशोर दराडे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. तसेच, एस. एम. के. डी. एज्युकेशन सोसायटीचे प्रशासकीय अधिकारी सचिन भोंगळे, कॉलेजचे प्राचार्य सुभाष चौधरी, आणि एम. के. डी. इंग्लिश मीडियम स्कूल व विद्यालयाचे प्राचार्य जीनेश. के. यु. यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

या विद्यार्थ्यांच्या यशामागे त्यांचे क्रीडा शिक्षक प्रशांत शिंदे, प्रशिक्षक जगदीश जाधव, क्रीडा शिक्षक योगेश मोरे आणि चंद्रकांत बारस्कर सर यांचे अमूल्य मार्गदर्शन लाभले. एम. के. डी. कॉलेज व विद्यालयाच्या वतीने या दोन्ही खेळाडूंना आगामी विभागीय वुशु स्पर्धेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

### मोदींच्या वाढदिवसानिमित्त बुधावलीत 'सेवा पंधरवाडा'

# जिल्हा उपाध्यक्ष शानूताई वळवी यांच्या कडून २०० महिलांना साडी वाटप

### विजयादशमीच्या मुहूर्तावर महिलांचा सन्मान; मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न

**नंदुरबार । दिपक गोसावी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभरात सुरू असलेल्या 'सेवा पंधरवाडा' कार्यक्रमांतर्गत तळोदा तालुक्यातील बुधावली ग्रुप ग्रामपंचायत येथे एका महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विजयादशमी (दसरा) आणि वाढदिवसाचे औचित्य साधून जिल्हा उपाध्यक्ष शानूताई प्रताप वळवी यांनी एका स्तुत्य उपक्रमातून २०० महिलांना स्वखर्चाने साड्यांचे वाटप केले.

शानूताई वळवी यांच्या पुढाकाराने




आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात बुधावली परिसरातील २०० महिलांना साडी वाटप करण्यात आले. सेवा आणि सन्मान या मूल्यांवर आधारित हा उपक्रम महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण करणारा ठरला.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाध्यक्ष निलेश माळी, जिल्हा महामंत्री कैलास चौधरी, ओबीसी मोर्चा जिल्हा अध्यक्ष मनोज गायकवाड, विधानसभा प्रमुख प्रा. विलास डांबरे, बळीराम पाडवी, अंबालाल साठे, उपाध्यक्ष श्रावण तिजवीज आणि व्यापारी आघाडी जिल्हा उपाध्यक्ष दीपक कलाल यांची प्रमुख उपस्थिती लाभली.उपस्थित मान्यवरांनी पंतप्रधान मोदींच्या देशसेवेच्या कार्याचा गौरव करून, शानूताई वळवी यांनी विजयादशमीच्या मंगलमय मुहूर्तावर केलेल्या या सामाजिक योगदानाबद्दल त्यांचे विशेष कौतुक केले. याप्रसंगी अनेक कार्यकर्त्यांनी व ग्रामस्थांनी या सेवा कार्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# नाम फाउंडेशनच्या वतीने शिरूर व केज तालुक्यातील शेकडो पूरग्रस्त कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप


**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या हृदयांवर कोसळलेल्या प्रचंड पुराने बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रात थैमान घातले आहे. जिल्ह्याचे चित्र पूर्णपणे बदलून टाकले आहे.पावसाने केलेल्या कहरामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळित झाले आहे. नद्यांनी रुद्र अवतार धारण केल्यामुळे अनेक गावे पाण्याखाली सापडली आहेत, ज्यामुळे हजारो कुटुंब संकटाच्या कचाट्यात सापडले आहेत,आशा कठिण प्रसंगी नाम फाउंडेशन तर्फे पुरग्रस्तांना फुल न् फुलाची पाकळी म्हणून मदत आशेचा किरण ठरत आहे.संकटाने ग्रासलेल्या लोकांना जीवनात पुन्हा उजेड आणण्यासाठी हा एक सक्रिय प्रयत्न आहे आणि या महत्त्वाकांक्षी उपक्रमातुन खरी नाम फाउंडेशन तर्फे पुरग्रस्तांना मदत ही एक स्तुत्य उपक्रम आहे, अनेक घरात पाणी शिरले आणि होत्याच नव्हत झालं.गोरगरीबाचे संसार उघड्यावर आले पिकाचे अतोनात नुकसान झाले,जनावरे वाहुन गेले नव्हे तर माणसं सुध्दा वाहुन गेले हा वेदनादायी आघात शेतकऱ्यांवर झाला आहे, ज्या शेतकऱ्यांचे जिवन पावसावर अवलंबून आहे तोच पाऊस त्यांच्यासाठी संकट ठरला आहे ,हजारो हेक्टर क्षेत्र पाण्याखाली सापडली पिके पाण्यात गेली या मुळे शेतकऱ्यांच्या वर्षाच्या मेहनतीवर पाणी फिरले गेले आशा वेळी केवळ सरकारी मदतीवर अवलंबून रहाने पुरेसे नसते तर समाजातील विविध घटकांनी पूढे येऊन मदतीचा हात द्यावा लागतो, यासाठीच शिरूर व केज तालुक्यातील इस्थळ येथे नाम फाउंडेशन तर्फे शेकडो पूरग्रस्त कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले यावेळी इस्थळ येथील नागरीक, पत्रकार, सरपंच प्रतिष्ठीत नागरिक व युसुफ वडगाव पोलीस स्टेशन चे साहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या नेतृत्वाखालील पोलिस कर्मचारी उपस्थित होते.

# भगवान भक्ती गडावरील दसरा मेळाव्यास उपस्थित रहा-दत्ता धस

**गौतम बचुटे । केज**

सावरगाव घाट येथील भगवान भक्ती गडावर भाजपच्या नेत्या आ. पंकजा मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या दसरा मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन भाजपचे बीड जिल्ह्याचे नेते दत्ता धस यांनी केले आहे.



स्व. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी सुरू केलेली दसरा दसरा मेळाव्याची परंपरा त्यांच्या सुपुत्री तथा पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री. ना. पंकजाताई मुंडे आणि माजी खा. डॉ. प्रतिमाताई मुंडे यांनी कायम ठेवली आहे. संतश्रेष्ठ भगवान बाबा यांच्या जन्मभूमी सावरगाव घाट येथील भगवान भक्ती गडावर दरवर्षी घेण्यात येणाऱ्या दसरा मेळाव्याची जय्यत तयारी सुरू झाली आहे. यंदाचा २ ऑक्टोबर रोजी होत असलेला दसरा मेळावा हा माजी मंत्री आ. पंकजा मुंडे आणि माजी खा. डॉ. प्रतिमाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली ऐतिहासिक होणार आहे. बीड जिल्ह्यातील मुंडे समर्थकांनी ऐतिहासिक मेळाव्याचे साक्षीदार होण्यासाठी मेळाव्यास लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन भाजपचे बीड जिल्ह्याचे नेते दत्ता धस यांनी केले आहे.

# सोशल मीडियावर जातीय तेढ निर्माण होणारे संदेश अथवा व्हिडिओ प्रसारित करू नये- सहा.पो.निरीक्षक रमेश वावरे

**वडाळी । लाला चव्हाण**

गेल्या काही दिवसांपूर्वी आदिवासी युवकाची हत्या करण्यात आल्याने जिल्ह्यात काही उपद्रवी कडून नंदुरबार शहरात गाड्याची तोडफोड करण्यात आल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कोणत्याही प्रकाच्या अक्षपार्ह मजकूर, चेतावणीखोर संदेश, जातीय तेढ निर्माण करणारा व्हिडिओ प्रसारित करु नये.

नंदुरबार सायबर सेल याकडे बारकाईने लक्ष ठेवून आहे. जे कोणी सोशल मीडियावर अश्या प्रकारे व्हिडीओ व्हायरल करीत असतील त्याची माहिती पोलिसांत द्या त्याच्या वर कायदेशीर कारवाई करण्यात



येणार असल्याचे मंगळवारी वडाळी येथे ग्रामपंचायत कार्यालयात बोलतांना सांगितले.यावेळी वडाळी ग्राम पंचायत. उपसरपंच या अभय गोसावी, पो.पाटील गजेंद्र गोसावी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077